247

# सामर्थ्यवान राष्ट्रांच्या निर्मितीसाठी युवकांची भुमिका

**डॉ. राजेश चंद्रवंशी**
शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक
श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

**सारांश**

राष्ट्र या शब्दाचा अर्थ हा खुप व्यापक व विविध अर्थ समाविष्ट असलेला आहे. राष्ट्र म्हटले की त्यामध्ये भौगोलिक, सामाजिक, राजकिय व धार्मिक अश्या विविध संकल्पनेचा प्रभाव दिसून येतो. राष्ट्राला सामर्थ्यवान करण्याच्या दृष्टीने त्या राष्ट्रातील युवकांची भुमिका या बाबत उहापोह करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय युवा धोरण २०१४ नुसार १५ ते २९ वयोगटातील सर्वाना युवक असे संबोधल्या जाते. सद्यस्थितीत युवकांच्या राष्ट्र संबंधी विचार, अपेक्षा व राष्ट्र विकासामध्ये योगदान या सारख्या घटकांवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मितीसाठी युवकांची भुमिका कशी असावी. या संदर्भात युवकांची वैयक्तीक, सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती कशी आहे व त्यानुरुप सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मितीसाठी त्याचे योगदान व महत्व या ज्वलंत विषयावर गहन अध्ययन करणे या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. युवकांची वैयक्तीक, सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीशी संबंधीत सर्व समस्याची जाणीव व युवकांना वास्तविकतेचे दर्शन करुन देणे, योग्य गोष्टी करिता समर्थन, मार्गदर्शन, सहकार्य किंवा प्रेरणा देणे ही काळाची गरज आहे. युवक हा सशक्त, उच्च शिक्षीत, संशोधनाची आवड असलेला, सुजाण नागरिक, आर्थिक दृष्टया स्वयंभू, राजकीय व सामाजिकदृष्टया जागूत असावा. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी राष्ट्र समोरील समस्याच्या निराकरणाच्या दृष्टीने, परिस्थिती व विकासात्मक घटका नुसार युवकांचा सर्वागीण विकास व योगदान हे अत्यंत महत्वाचे आहे. सशक्त युवकच हा सामर्थ्यवान राष्ट्र निर्मीतीचा जणु पायाच आहे. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी युवकांची भुमिका अत्यंत महत्वाची आहे.

**प्रस्तावना**

राष्ट्रीय युवा धोरण २०१४ नुसार १५ ते २९ वयोगटातील सर्वाना युवक असे संबोधल्या जाते. सद्यस्थितीत युवकांच्या राष्ट्र संबंधी विचार, अपेक्षा व राष्ट्र विकासामध्ये योगदान या सारख्या घटकांवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. युवकमध्ये एक शक्ती असते जी कोणतेही कार्य जोमाने करु शकते. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मितीमध्ये युवकांची भुमिका ही कशी असावी व त्याकरिता युवकांमध्ये कोणकोणते सामर्थ्य आहे किंवा जीवना प्रती विचारसरणी यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने विचार करणे ही काळाची गरज बनली आहे.

**उद्देश**

सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मितीसाठी युवकांची भुमिका कशी असावी. या संदर्भात युवकांची वैयक्तीक, सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती कशी आहे व त्यानुरुप सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मितीसाठी त्याचे योगदान व महत्व या ज्वलंत विषयावर गहन अध्ययन करणे या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

**युवकांची वैयक्तीक परिस्थिती**

आजच्या युवकाच्या जीवनातील वेळ हा पुर्णतः व्यस्त व त्रस्त झालेला दिसुन येतो यामध्ये शिक्षण, शिक्षणासंबंधी पालकाचा दबाव , मोबाईलमुळे सामाजिक प्रचार माध्यमामध्ये गुरफटलेला, मोबाईल गेम्स व चॅटींगमध्ये वेळ घालणारा, मौजमस्ती, फॅशन, व्यसनाधिनता, पोषक आहारासंबंधी उदासिनता तर जंक फुड वर विशेष भर देणारा, धर्मामध्ये विभाजीत झालेला, वेळेचे व्यवस्थापन नसलेला व काहीसा दिशाहीन झाल्यासारखाच दिसुन येत आहे.

**युवकांची सामाजिक परिस्थिती**

आजचा युवक हा समाजातील चाली, रिती व रुढी यांना न मानणारा होत चालला असुन यातील चांगल्या परंपरापासुन सुध्दा दुरावत चालला आहे. आजच्या आधुनिकरणाच्या युगात जीवनामध्ये आधुनिकता येणे हे स्वाभाविक आहे पण या परिस्थितीशी समन्वय साधतांना जीवनाचा सामाजिक ढांचाच नष्ट करणे संयुक्तिक नाही हे युवकाला कळणे अत्यावश्यक झाले आहे.

**युवकांची राजकीय परिस्थिती**

राजकीय क्षेत्रामध्ये निश्चितच यश मिळेल असे नसते म्हणून सहसा कोणीही या क्षेत्रात पर्दापण करण्याच्या आधी खुप विचार करतो व मगच या क्षेत्रात येतो. युवकांच्या वैयक्तिक व सामाजिक परिस्थितीच्या अध्ययनावरुन हे निश्चित होते की आजचा युवक हा एकादया परिस्थिती विषयी गंभीर, सखोल विचार केलेला, स्थैर्य विचारसरणी असलेला व कठीण संघर्षाला सामोरे जाणारा असे दिसून येत नाही. यामुळे राजकिय क्षेत्रामध्ये युवकांचा समावेश नगण्य आहे. युवकांना मोठया प्रमाणत राजकीय नेतूत्व नसल्यामुळे त्यांच्या समस्या या वाढतच जावून ते स्वतः निर्मित केलेल्या समस्यामध्ये रसातळाला जात आहेत.

**युवकांची आर्थिक परिस्थिती**

युवकांची आर्थिक स्थिती ही वैयक्तीक व कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर अवलंबुन असते. सद्यस्थितीत मोठया प्रमाणात आजचा युवकाची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. कारण फक्त शिक्षण व ते ही नोकरी लागली पाहिजे याच उद्देशाने घेत असल्यामुळे नोकरीशिवाय पर्याय नाही व नोकरीच्या संधी खुपच कमी यामुळे बेरोजगारीचे प्रमाणात लक्षणीय वाढ सातत्याने होत असल्याचे दिसून येत आहे. व्यवसायाकरिता आवश्यक असलेल्या मुलभूत कौशल्य विकासावर आधारीत अभ्यासक्रमाबाबत उदासिनता यामुळे आजचा युवक हा नोकरी न भेटल्यास नकारात्मक विचाराने ग्रसित होत आहे. नोकरी नाही, व्यवसाय नाही व अर्थाजनासाठी मार्ग नाही यामुळे आजचा युवक हा कुटुंबावर आश्रित होत चालला आहे.

वरील सर्व समस्या टाळता येवू शकतात, त्यातून मार्ग सापडू शकतात किंवा काही युवक या समस्या सोडविण्यासाठी असमर्थ असू शकतात म्हणून यावेळी युवकांना वास्तविकतेचे दर्शन

करुन देणे, योग्य गोष्टी करिता समर्थन, मार्गदर्शन, सहकार्य किंवा प्रेरणा देणे ही काळाची गरज आहे.

सशक्त युवक हा राष्ट्र निर्मितीचा पाया असतो, युवकांना सशक्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे झाले आहे. युवकांच्या भविष्याचा विकास हा राष्ट्राला सामर्थ्यवान बनविण्यासाठी महत्वाचा ठरु शकतो. युवकांच्या उज्वल भविष्याकरिता व सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीच्या दृष्टीने पुढील महत्वपुर्ण बाबी प्रत्यक्षात युवकांच्या जिवनात अमलात आणण्याचा प्रयत्न केल्यास हे महत्वाचे ठरेल.

१. सद्यस्थितीत राष्ट्राला नोकरी करणाऱ्या युवकांपेक्षा कौशल्यावर आधारित व्यवसाय करणाऱ्या युवकांची आवश्यकता आहे. उद्योग क्षेत्रातील मोठे व लघु उद्योगात युवकांची भागीदारी वाढलीच पाहिजे अन्यथा राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख हा कमी होवू शकतो. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी कृषी क्षेत्र, विविध प्रकारचे उद्योग किंवा व्यवसाय, शासनाव्दारा संचालित विविध कौशल्यधिष्ठीत कंपन्या व शासकीय यंत्रणा, राष्ट्र संरक्षणाच्या दृष्टीने स्थलसेना, जलसेना व वायुसेना यामधील तांत्रीक कौशल्याशी संबंधीत असलेल्या नोकऱ्या अश्या अनेक प्रकारच्या नोकऱ्यामध्ये पात्र असलेली कौशल्यधिष्ठीत युवकांची राष्ट्राला सामर्थ्यवान बनविण्याकरिता आवश्यकता आहे.

२. आधुनिकरणाच्या जगात संशोधनाची जोड असलेल्या उच्च शिक्षणाची आवश्यकता आहे. संशोधनाने राष्ट्रच्या प्रगतीला बहुआयामी चालना मिळते व युवकांना विविध क्षेत्रात अनुभव प्राप्त करण्याची संधी मिळते. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी सद्य परिस्थितीवर आधारीत संशोधन, समाजपयोगी संशोधन, राष्ट्रासमोरील समस्येवर उपयायोजना करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक संशोधन, अर्थाजनासाठी नविन क्षेत्रातील संधी शोधणारे संशोधन या सारख्या असंख्य क्षेत्राचे दालन उघडणारे युवकांना प्रेरणा व दिशा देणाऱ्या संधोधनामध्ये युवकांना प्रेरीत करणे ही काळाची गरज बनली आहे.

३. सशक्त युवक बनविण्याच्या दृष्टीने शालेय ते उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये व्यायाम, क्रीडा क्षेत्र व साहसी क्रीडा प्रकाराचा समावेश अनीवार्य करण्यात यावे. शिक्षण व्यवस्थेमध्ये स्पर्धात्मक परिक्षेची पुर्व तयारी किंवा स्पर्धात्मक परीक्षेसंबंधी अभ्यासक्रमांचा समावेश हा आवश्यक आहे. तसेची राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, स्काऊट गाईड व सांस्कृतिक कार्यक्रम या सारख्या अभ्यासपुरक कार्यक्रमांना सुध्दा गुणपत्रिकेमध्ये विशेष उल्लेख करावयाला हवा. मोबाईल मध्ये व्यस्त, व्यसनाधिन, पोषक आहारापासून दुरावल्यामुळे अशक्त युवक, मौजमस्तीमध्ये व्यस्त असलेला युवक तसेच वेळ, शिस्त व अनुशासन याला महत्व न देणारा युवक हा सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीला मारक ठरु शकतो.

४. युवकांना सामाजिकतेची व राजकियतेची जाणीव करणाऱ्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे जेणे करुन युवकांना वास्तविकतेचे ज्ञान होईल व दिशाहीन जीवनातून बाहेर येवून युवक हा सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीमध्ये महत्वपूर्ण भुमिका पार पाडू शकेल.

५. सामर्थ्यवान राष्ट्र ही संकल्पना तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा त्यामधील जनसमुदाय हा शारीरिक, मानसिक, भावनात्मक व व्यवहारिक दृष्टया समर्थ असेल त्याच बरोबर आर्थिकदृष्टया स्वयंभू व सशक्त नागरिक म्हणून राष्ट्राप्रती आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडेल.

६.राष्ट्राला अंतर्गत संरक्षण देण्याच्या दृष्टीने आंतकवादी, दहशतवादी व राष्ट्र विरोधी कार्य करणाऱ्या दिशाहीन युवकांना परावृत्त करुन सामर्थ्यवान राष्ट्र निर्मीतीच्या विचारधारेमध्ये परावर्तीत करणाऱ्या युवकांची सुध्दा राष्ट्राला नितांत आवश्यकता आहे.

वरिल सर्व बाबीचा विचार केल्यास असे निर्दशनास येते की युवक हा सशक्त, उच्च शिक्षीत, संशोधनाची आवड असलेला, सुजाण नागरिक, आर्थिक दृष्टया स्वयंभू, राजकीय व सामाजिकदृष्टया जागृत असावा.

**निष्कर्ष**

सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी राष्ट्र समोरील समस्याच्या निराकरणाच्या दृष्टीने, परिस्थिती व विकासात्मक घटका नुसार युवकांचा सर्वागीण विकास व योगदान हे अत्यंत महत्वाचे आहे. सशक्त युवकच हा सामर्थ्यवान राष्ट्र निर्मीतीचा जणु पायाच आहे. सामर्थ्यवान राष्ट्राच्या निर्मीतीसाठी युवकांची भुमिका अत्यंत महत्वाची आहे.

**संदर्भ**

१. दिल्ली,आय.(२०१९). प्रॉब्लेम्स फेसेड बाय युथ ऑफ इंडिया— आयवायएफ दिल्ली. रिट्रीव्हीड १०ऑगस्ट २०१९, फार्म एचटीटीपीएक:// आयवायएफदिल्ली.कॉम/ प्रॉब्लल्स —फेसेड —बाय —युथ —ऑफ —इंडिया//

२. घोष,एस.(२०१९). सोशल प्रॉब्लेम्स ऑफ टीनअेजरर्स— इंडियन युथ. (ऑन लाईन) इंडियन युथ. रिट्रीव्हीड १०ऑगस्ट २०१९,फार्म एचटीटीपीएक://डब्ल्युडब्ल्युडब्ल्य. इंडियनयुथ.नेट/सोशल—प्रॉब्लेम्स — ऑफ—टीनअेजरर्स/